

# Valmet
# ची आचारसंहिता

Valmet

# Valmet ची आचारसंहिता

प्रिय Valmet सहकारी आणि भागीदार,

## Valmet साठी प्रामाणिकपणाने, सचोटीने आणि काळजीने वागणे हाच एकमेव सर्वमान्य मार्ग आहे.

योग्य गोष्टी करुन आम्हाला पाठिंबा देण्यासाठी, आम्ही Valmet  आचार संहिता बनविलेली आहे. या संहितेमधे व्यक्ती, संघ आणि कंपनी या साऱ्यांसाठी, नैतिकता, जबाबदाऱ्या योग्य पद्धतीने परिभाषित केल्या आहेत.

या संहितेचा उद्देश Valmet च्या सर्व कर्मचाऱ्यांना, तसेच आमच्या भागधारकांना कंपनीच्या गरजा आणि अपेक्षांची माहिती देऊन Valmet च्या व्यवसायाचे रक्षण करणे हा आहे.

आमच्या व्यवसायाच्या क्षेत्रात आम्हाला जागतिक नेता म्हणून ओळखले जाते आणि आमचा आदर केला जातो; भविष्यातही लोकांच्या याच विश्वासाला आणि अपेक्षांना पात्र राहू याची आम्हाला खात्री करायची आहे. यासाठी आमची मूल्ये आणि आमची आचारसंहिता याबर हुकूम चालून आम्ही आमचे  व्यवसाय धोरण आणि ऑपरेशन्सच्या केंद्रस्थानी टिकाव धरणे हे साध्य करतो. आमची सर्व ऑपरेशन्स  आणि कृती कायदे आणि नियमांचे काटेकोर पालन करतात आणि सामाजिक जबाबदारीने पार पाडली  जातात याची आम्ही खात्री करतो.

ही आचारसंहिता Valmet मध्ये काम करताना काय करावे आणि करू नये याबद्दलची मार्गदर्शक तत्वे प्रदान करते. ही तत्वे आमच्या संस्थेच्या जगातील प्रत्येक भागात वैध आहे. या संहितेबद्दल पूर्ण माहिती जाणून घेणे आणि तिचा आपल्या दैनंदिन कामाच्या सर्व पैलूंमध्ये काटेकोरपणे वापर करणे हे आपल्यापैकी प्रत्येकाने निरपवादपणे करायचे आहे.



Valmet शाश्वतपणे पुढे नेल्याबद्दल धन्यवाद.

पासी लाईन (Pasi Laine)
अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी
Valmet

# अनुक्रमणिका

4 आमची वचनबद्धता

- अखंडतेची बांधिलकी
- आमची मूल्ये
- आंतरराष्ट्रीय तत्त्वे

8 व्यवसाय तत्त्वे

- कायदे आणि नियमांचे अनुपालन
- निष्पक्ष स्पर्धा
- खुले आणि प्रामाणिक संवाद
- बौद्धिक मालमत्ता आणि कंपनीची मालमत्ता
- विदा गोपनीयता
- भ्रष्टाचार आणि लाचखोरी प्रतिबंध
- व्यापार अनुपालन

16 लोक, समाज आणि पर्यावरण

- मानवी हक्कांचा आदर
- समान संधी, विविधता आणि समावेश
- कार्यस्थळाची सन्माननीयता
- आरोग्य, सुरक्षितता आणि लोककल्याण यांचे रक्षण
- सार्वजनिक घडामोडी
- समुदायाचा सहभाग आणि प्रायोजकत्व
- ऑपरेशन्सची पर्यावरणीय कार्यक्षमता
- उत्पादने आणि सेवांमध्ये हवामान आणि गोलाकारता
- उत्पादन आणि सेवा गुणवत्ता
- शाश्वत पुरवठा साखळी

27 गैरवर्तनाची तक्रार करणे

ही आचारसंहिता Valmet संचालक मंडळाने मंजूर केली आहे आणि ती आमच्या सर्व कर्मचाऱ्यांना आणि बाह्य भागीदारांना लागू होते. या आचारसंहितेचे आणि आमच्या धोरणांचे उल्लंघन केल्यास शिस्तभंगाची कारवाई होऊ शकते. आम्ही सद्भावनेने त्यांच्या चिंता व्यक्त करणाऱ्या किंवा संभाव्य उल्लंघनांच्या तपासात सहाय्य करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध कोणत्याही प्रकारची सूडबुद्धी सहन करत नाही.


Valmet
Valmet
आमची वचनबद्धता

# अखंडतेची बांधिलकी

Valmet अखंडता  म्हणजे प्रामाणिकपणा आणि मजबूत नैतिक तत्त्वे. आम्ही आमच्या धोरणांचा, वचनांचा आणि वचनबद्धतेचा आदर करतो. आम्ही आमच्या सर्व व्यवहारात प्रामाणिक आणि निष्पक्ष आहोत. आपल्या सर्व कृती, निर्णय, विधाने आणि संप्रेषणांसाठी अखंडता मूलभूत आहे.

## नैतिक निर्णय घेण्याची चौकट

Valmet संभाव्य कृती करताना जेव्हा नैतिकता किंवा अनुपालनाचा प्रश्न येतो तेव्हा ची नैतिक निर्णय-निर्धारण चौकट आम्हाला योग्य निवडी करण्यात मदत करते. खात्री नसेल तेव्हा कृती करण्यापूर्वी आपण नेहमी विचार करावा आणि त्या चौकटीचे सुयोग्य मार्गदर्शन घ्यावे.

कृती करण्यापूर्वी नेहमी खालील प्रश्नांचा विचार करा:

- ही कृती Valmet ची मूल्यांचे आणि धोरणांचे पालन करते का?
- ही कारवाई किंवा निर्णय कायदेशीर आहे का?
- माझ्याकडे पुरेशी माहिती आहे का?
- आपला निर्णय किंवा कृती सार्वजनिक होणे लाजिरवाणे असेल का?



# आमची मूल्ये

Valmet ची सामायिक मूल्ये आम्ही Valmet येथे करत असलेल्या प्रत्येक कामाचा पाया आहेत आणि ते आमच्या आचारसंहितेचे जोरदार समर्थन करतात.

आमची मूल्ये आमच्या वर्तनाचे मार्गदर्शन करतात आणि त्यास आकार देतात तसेच  आम्हाला आमचे ध्येय, रणनीती, Must-wins आणि व्हिजन - **Valmet's Way Forward शी जोडतात.**

### ग्राहक

आम्ही आमच्या ग्राहकांची कामगिरी अग्रेसर ठेवतो.

### नूतनीकरण

आम्ही भविष्य घडवण्यासाठी नवीन कल्पनांना प्रोत्साहन देतो..

### उत्कृष्टता

योग्य परिणाम देण्यासाठी आम्ही नियमितपणे  सुधारणा करतो.

### लोक

दृश्यमान फरक करण्यासाठी आम्ही एकत्र काम करतो.

आमची मूल्ये आमच्या व्यवस्थापक आणि कर्मचाऱ्यांच्या भूमिकांद्वारे समर्थित आहेत, जे वैयक्तिक आणि व्यवस्थापकाच्या दृष्टीकोनातून कार्यक्षमतेला चालना देणारे, प्रतिबद्धता वाढवणारे आणि विकासाला समर्थन देणारे वर्तन यांची पुष्टी करतात. या भूमिकांचे पालन करून, आपल्यापैकी प्रत्येकजण Valmet च्या यशात योगदान देऊ शकतो.

# आंतरराष्ट्रीय तत्त्वे

जागतिक तंत्रज्ञान आणि सेवा पुरवठादार म्हणून, Valmet चा जगभरातील अनेक समुदायांवर प्रभाव आहे. आमची सर्व कार्ये, जबाबदार आणि जागतिक स्तरावर संरेखित पद्धतीने पार पाडली जावीत यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. आम्ही आंतरराष्ट्रीय अधिवेशने आणि मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्यास वचनबद्ध आहोत, जसे की:

- यूएन ग्लोबल कॉम्पॅक्ट आणि सस्टेनेबल डेव्हलपमेंट गोल्स
- यूएन सार्वत्रिक मानवाधिकार घोषणा
- व्यवसाय आणि मानवी हक्कांवरील यूएन मार्गदर्शक तत्त्वे
- कामासंबंधी मूलभूत तत्त्वे आणि अधिकारांवर ILO घोषणा
- बहुराष्ट्रीय उपक्रमांसाठी OECD ची मार्गदर्शक तत्त्वे



# व्यवसाय तत्त्वे





# कायदे आणि नियमनांशी अनुपालन

- आम्ही सर्व लागू राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कायदे आणि नियमांचे पूर्ण पालन करण्यास वचनबद्ध आहोत.
- कायदे आणि नियमांचे आणि या आचारसंहितेचे पालन सुनिश्चित करण्यासाठी आम्ही सर्वोत्तम उपलब्ध तज्ज्ञांचा शोध घेऊन याबाबत त्यांचा सल्ला घेतो.
- आमचे पुरवठादार, वितरक, एजंट, सल्लागार आणि इतर व्यावसायिक भागीदार यांनी सुद्धा सर्व लागू कायदे आणि नियमांचे पूर्णपणे पालन करावे अशी आमची अपेक्षा आहे.

## काय करा आणि काय करू नका:

- तुम्ही ज्या ऑपरेशन्समध्ये काम करता आणि त्याचे नेतृत्व करत आहात त्यासाठी लागू कायदेशीर आवश्यकतांबाबत अद्ययावत रहा.
- एकमेकांकडून, आमचे पुरवठादार, वितरक, एजंट, सल्लागार आणि इतर व्यावसायिक भागीदार यांच्याकडून कायदे आणि नियमांचा कोणताही अनादर स्वीकारू नका.

# निष्पक्ष स्पर्धा

- आम्ही निष्पक्ष स्पर्धा आणि मुक्त बाजारपेठेचे समर्थन करतो आणि अशा प्रकारे प्रभावी स्पर्धेला अडथळा आणणाऱ्या किंवा प्रतिबंधित करणाऱ्या कोणत्याही क्रियाकलापांमध्ये सहभागी होत नाही.
- आम्ही किंमत, बाजार समभाग किंवा इतर तत्सम क्रियाकलापांशी संबंधित प्रतिस्पर्ध्यांशी चर्चा किंवा करार करण्यास नकार देतो.
- आम्ही, ग्राहक, पुरवठादार, वितरक आणि इतर व्यावसायिक भागीदारांसह सर्व करार, लागू स्पर्धा कायद्यांचे पालन करत असल्याची नेहमीच खात्री करतो.

## काय करा आणि काय करू नका:

- तुम्ही ज्या देशांत काम करता त्या देशांच्या स्पर्धा कायद्यांचे आणि आपल्या स्पर्धा कायद्याच्या मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोर पालन करा.
- प्रतिस्पर्ध्यांशी संवेदनशील व्यवसाय माहितीची चर्चा किंवा देवाणघेवाण अजिबात करू नका.



# खुले आणि प्रामाणिक संवाद

- आम्ही आमच्या भागधारकांना आमची स्थिती आणि कार्यप्रदर्शनाची पारदर्शक माहिती एकाच वेळी आणि समान रीतीने कोणत्याही गट किंवा व्यक्तीला प्राधान्य किंवा अनुकूलता न देता प्रदान करतो.
- आम्ही कायदे, स्टॉक एक्स्चेंजचे नियम, तसेच इक्विटी आणि डेट कॅपिटल मार्केटच्या स्वीकृत पद्धतींचे काटेकोर पालन करतो.
- आम्ही सूचीबद्ध कंपनीचे आर्थिक लेखा आणि अहवाल नियंत्रित करणारे सर्व लागू कायदे आणि नियमांचे तंतोतंत पालन करतो आणि अचूक आणि सातत्यपूर्ण माहितीचे प्रकाशन सुनिश्चित करण्यासाठी योग्य अंतर्गत नियंत्रणे ठेवतो.

## काय करा आणि काय करू नका:

- Valmet किंवा इतर कोणत्याही कंपनीचे शेअर्स ट्रेडिंग करताना, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे, अंतर्गत माहिती वापरू नका.
- अफवा किंवा इतर असत्यापित माहिती पसरवू नका वा त्यावर टिप्पणी करू नका.
- तथ्ये किंवा आर्थिक विदा कोणत्याही प्रकारे चुकीच्या पद्धतीने मांडू नका.



# बौद्धिक मालमत्ता आणि कंपनीची मालमत्ता

- आम्ही अर्जित ज्ञान आणि बौद्धिक मालमत्तेच्या निर्मिती आणि संरक्षणास महत्त्व देतो.
- आम्ही Valmet च्या बौद्धिक संपत्तीचे रक्षण करण्यासाठी नेहमी कार्यरत राहतो आणि त्यात अनधिकृत प्रवेशास कधीही अनुमती देत नाही.
- आम्ही इतर पक्षांच्या बौद्धिक मालमत्तेचा आदर करतो आणि ते बेकायदेशीर मार्गाने मिळवण्याचा प्रयत्न करत नाही.
- आम्ही गोपनीय माहिती, माहिती प्रणाली, तंत्रज्ञान आणि Valmet च्या भौतिक मालमत्तेचे नुकसान, चोरी आणि गैरवापरापासून नेहमीच संरक्षण करतो.

## काय करा आणि काय करू नका:

- आमच्या माहिती तंत्रज्ञान वापर धोरण आणि बौद्धिक संपदा धोरणाचे तंतोतंत पालन करा.
- कोणत्याही प्रकारची संवेदनशील किंवा गोपनीय माहिती काळजीपूर्वक हाताळा.
- तुमच्या वैयक्तिक हेतूंसाठी Valmet च्या मालमत्ता वापरू नका.





# विदा गोपनीयता

- आम्ही संबंधित कायदे आणि कंपनीच्या तत्त्वांचे पालन करून वैयक्तिक विदा हाताळून व्यक्तींच्या गोपनीयतेचा आदर करतो.
- आम्ही गोपनीयता नियमांबद्दल जागरूक आहोत आणि केवळ संबंधित व्यावसायिक हेतूंसाठी वैयक्तिक विदा संकलित करतो आणि त्यावर प्रक्रिया करतो.

### काय करा आणि काय करू नका:

- केवळ न्याय्य, कायदेशीर हेतूंसाठी वैयक्तिक विदा वर प्रक्रिया करा आणि तिला संचयित करा.
- वैयक्तिक विदा नेहमी काळजीपूर्वक हाताळा.
- अनधिकृत प्रवेश, बदल आणि तोटा यापासून योग्य सुरक्षा उपायांद्वारे वैयक्तिक विदाचे संरक्षण करा.

# भ्रष्टाचार आणि लाचखोरी प्रतिबंध

- आम्ही सर्व प्रकारच्या भ्रष्टाचार आणि लाचखोरीबद्दल शून्य सहनशीलता बाळगतो.
- आम्ही सर्व लागू भ्रष्टाचार विरोधी कायदे आणि नियमांनुसार आमचे क्रियाकलाप कार्यान्वित करण्यास वचनबद्ध आहोत.
- आपण आपले ग्राहक, वितरक, एजंट, पुरवठादार आणि इतर व्यावसायिक भागीदार यांबद्दल माहिती ठेवली पाहिजे तसेच आम्ही भ्रष्टाचारविरोधी कायदे आणि नियमांचे पूर्णपणे पालन न करणाऱ्या व्यावसायिक भागीदारांसोबत व्यवसाय करत नाही.
- आम्ही कोणत्याही प्रकारचे स्वारस्यांचे संघर्ष टाळतो.
- आम्ही कोणत्याही परिस्थितीत जगभरातील आमच्या ऑपरेशन्समध्ये मनी-लाँडरिंग किंवा दहशतवादी आणि गुन्हेगारी क्रियाकलापांना निधी पुरवण्यात सहभागी होत नाही किंवा त्याचे समर्थन करत नाही.

### काय करा आणि काय करू नका:

- आमच्या भ्रष्टाचार विरोधी धोरणाचे पालन करा आणि आपल्या व्यवसाय भागीदारांचे धोरण जाणून घ्या.
- आपल्या व्यवसाय भागीदारांकडून सामान्य मानकांपेक्षा अधिक भेटवस्तू व आतिथ्य देऊ वा स्वीकारू नका, किंवा तसे वचनही देऊ नका.
- लाच, टक्केवारी रक्कम किंवा इतर बेकायदेशीर पेमेंट किंवा सूट देऊ नका किंवा स्वीकारू नका.
- अधिकाऱ्यांकडून अनुकूल निर्णय मिळविण्यासाठी किंवा सेवा सुलभ करण्यासाठी पैसे देऊ नका.
- हितसंबंधांमध्ये संघर्ष होऊ शकतो अशा व्यावसायिक संबंधांमध्ये गुंतू नका - जर तुमचे वैयक्तिक जीवन किंवा नातेसंबंध तुमच्या निर्णय घेण्यावर परिणाम करत असतील, तर तुमच्या व्यवस्थापकाचा सल्ला घ्या, कोणताही संबंध नसलेला सहकारी निर्णय घेत असल्याची खात्री करा आणि सदर प्रक्रिया नोंदवा.

# व्यापार अनुपालन

- आम्ही सर्व लागू व्यापार मंजुरी आणि निर्यात नियंत्रण कायदे आणि नियमांचे पालन करण्यास वचनबद्ध आहोत.
- आम्ही व्यापार निर्बंधांच्या अधीन असलेल्या पक्षांसोबत व्यवहार करत नाही.
- आम्ही लागू निर्यात नियंत्रणांनुसार वस्तूंची निर्यात करतो आणि आवश्यकतेनुसार परवाने आणि अधिकृती मिळवतो.

## काय करा आणि काय करू नका:

- सर्व लागू निर्यात नियंत्रण कायदे आणि नियमांचे पालन करा, तसेच आपले व्यवसाय भागीदाराबद्दल माहिती करुन घेण्याचे धोरण जाणून घ्या.
- व्यापार निर्बंध आणि निर्यात नियंत्रणे आणि त्यांच्याशी संबंधित आमच्या प्रक्रियांबद्दल जागरूकता वाढवण्याचा प्रयत्न करा.
- तुम्हाला व्यवसाय भागीदार अनिश्चित वाटत असल्यास किंवा त्याच्या व्यवहाराबाबत काही चिंता असल्यास योग्य मार्गदर्शन घ्या.



# लोक, समाज आणि पर्यावरण



# मानवी हक्कांचा आदर

- मानवी हक्कांच्या सार्वत्रिक घोषणा आणि आंतरराष्ट्रीय अधिवेशनांमध्ये नमूद केल्यानुसार आम्ही मानवी हक्कांचा आदर करतो.
- आम्ही लहान मुलांच्या हक्कांचे रक्षण करतो आणि बाल किंवा सक्तीच्या मजुरीमध्ये आम्ही सहभागी नसल्याची नेहमीच खात्री करतो.
- आम्ही सर्व कर्मचाऱ्यांसाठी आणि भागीदारांसाठी ILO नियमांनुसार चांगल्या कामाच्या परिस्थितीला प्रोत्साहन देतो.
- आम्ही आमच्या कर्मचाऱ्यांच्या संघटना आणि सामूहिक सौदेबाजीच्या स्वातंत्र्याच्या अधिकाराचा आदर करतो तसेच आमचे कर्मचारी आणि कर्मचारी प्रतिनिधित्व संस्थांशी खुले आणि सक्रिय संवादाला प्रोत्साहन देतो.

### काय करा आणि काय करू नका:

- मानवी हक्कांचा आदर करणे म्हणजे काय ते समजून घ्या आणि Valmet च्या मानवी हक्क विधानांबद्दल जागरूक रहा.
- जिथे काम करता तिथल्या स्थानिक संस्कृती, रीतिरिवाज आणि स्थानिक लोक आणि समाज यांच्या मूल्यांचा आदर करा.





# समान संधी, विविधता आणि सर्वसमावेशकता

- आम्ही कर्मचाऱ्यांची नोकरीसाठीची निवड आणि नियुक्ती, त्यांची वैयक्तिक पात्रता, ज्ञान आणि कौशल्यांवर आधारित करतो.
- आम्ही लिंग, वय, वंश, धर्म, वांशिक किंवा राष्ट्रीय मूळ, राजकीय मत, कौटुंबिक स्थिती, लैंगिक प्रवृत्ती, लिंग ओळख, अपंगत्व किंवा कायद्याद्वारे संरक्षित केलेल्या इतर वैशिष्ट्यांच्या आधारावर भेदभाव करत नाही.
- आम्ही आमच्या कर्मचाऱ्यांची पार्श्वभूमी, प्रतिभा, अंतर्दृष्टी, शिक्षण आणि अनुभवातील विविधतेची प्रशंसा करतो. तसेच आम्हाला विश्वास आहे की या साऱ्यांमुळे नाविन्यपूर्णता, लवचिकता आणि आमच्या भागधारकांशी संवाद साधण्याची क्षमता वाढवून आमच्या यशात आणि शाश्वततेमध्ये मोठे योगदान देते.

### काय करा आणि काय करू नका:

- आमच्या समान संधी आणि विविधता धोरणाचे काटेकोर पालन करा.
- विविध पार्श्वभूमी आणि कौशल्ये असलेल्या व्यक्तींचे संघ तयार करा.
- एकमेकांशी संवाद साधताना आदरयुक्त आणि सर्वसमावेशक व्हा.

# आदरयुक्त कार्यस्थळ

- आमच्या संस्थेच्या यशाचा महत्त्वाचा भाग म्हणून आम्ही सांघिकतेला महत्त्व देतो. एकत्र काम करताना, आम्ही एकमेकांशी आदर, सौजन्य आणि निष्पक्षतेने वागतो, कल्पना सामायिक करण्यासाठी जागा वाढवतो.
- छळापासून मुक्त वातावरणात काम करण्याच्या आमच्या अधिकाराचे आम्ही मूल्य आणि संरक्षण करतो.
- एखाद्या कर्मचाऱ्याने किंवा आमच्या व्यावसायिक क्रियाकलापांशी संबंधित कोणत्याही व्यक्तीचे वर्तन आम्ही सहन करत नाही जे दुसऱ्या व्यक्तीच्या कामाच्या कार्यक्षमतेस त्रास देते, धमकावते, व्यत्यय आणते वा भीतीदायक, आक्षेपार्ह, अपमानास्पद किंवा प्रतिकूल कामाचे वातावरण तयार करते.

## काय करा आणि काय करू नका:

- आमच्या गैर-भेदभाव आणि छळविरोधी धोरणाचे पालन करा.
- तुमच्या दैनंदिन व्यवहारात इतरांच्या दृष्टिकोनाचा आदर करा.
- इतरांच्या विविध दृष्टीकोनांचा मोकळेपणाने आदर करा, मग ते सांस्कृतिक फरक, राजकीय विश्वास किंवा वैयक्तिक ओळखीच्या इतर कोणत्याही पैलूंमधून आलेले असोत.
- गुंडगिरी, हिंसा, लैंगिक छळ, शिक्षा किंवा कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन सहन करू नका.



# आरोग्य, सुरक्षितता आणि कल्याण यांचे रक्षण करणे

- आम्ही सर्वजण सुरक्षित, निरोगी आणि सुव्यवस्थापित कार्यस्थळाची जबाबदारी सामायिकपणे स्वीकारतो  करतो.
- आमचा विश्वास आहे की मजबूत सुरक्षा संस्कृती, प्रभावी जोखीम व्यवस्थापन आणि सतत सुधारणा करून गुंतवणूक करून सर्व घटना रोखल्या जाऊ शकतात.
- सुरक्षितपणे काम करून, आरोग्य आणि सुरक्षा क्रियाकलापांमध्ये सहभागी होऊन आणि एकमेकांची काळजी घेऊन उत्तम सुरक्षितता साधता येते हे आम्ही दाखवतो.
- संबंधित व्यवस्थापकांनी आम्हाला योग्य मार्गदर्शनाद्वारे आरोग्य आणि सुरक्षिततेचा सक्रियपणे प्रचार करावा असे आम्हाला वाटते.
- सोबत काम करत असलेल्या प्रत्येकाने आमची आरोग्य आणि सुरक्षितता या बद्दलची वचनबद्धता आणि आवश्यकता यांचा आदर करावा आणि त्याचे पालन करावे अशी आमची अपेक्षा आहे.

### काय करा आणि काय करू नका:

- आमचे आरोग्य, सुरक्षितता आणि पर्यावरण धोरण (HSE धोरण), जीवन बचाव नियम, किमान सुरक्षा मानके आणि जागतिक व्यवस्थापन प्रणालीसह आरोग्य आणि सुरक्षा कायदे आणि नियमांचे पालन करा.
- आपल्या दैनंदिन कामातील आरोग्य आणि सुरक्षितता धोके तसेच त्यांना प्रतिबंध करण्यासाठी तुम्ही कोणकोणत्या कृती करू शकता हे नेहमी समजून घ्या.
- तुम्ही दररोजच्या कामासाठी तंदुरुस्त असल्याची खात्री करा.
- कोणतीही असुरक्षित कृती किंवा ज्यासाठी तुम्ही प्रशिक्षित नाही अशी कृती कधीही करू नका.
- सर्व घटना, नीअर मिस केसेस किंवा सुरक्षितता निरीक्षणे यांची नोंद ठेवा म्हणजे आपण आपली कार्यपद्धती सुधारू शकू.





# सार्वजनिक घडामोडी

- आम्ही कोण आहोत आणि आमची मते आणि भूमिका काय आहेत हे आम्ही उघडपणे सांगतो.
- आम्ही Valmet च्या दृष्टीकोनातून बोलतो.
- पैरवीमध्ये आमचे प्रतिनिधित्व करण्यासाठी आम्ही कोणत्याही तृतीय पक्षाचा वापर करत नाही.
- आम्ही आमची मते आणि स्थिती काळजीपूर्वक तयार करतो आणि आमच्या निपुणतेच्या आधारावर त्या व्यक्त करतो केवळ त्यामुळेच  आम्हाला संबंधित विषयावर बोलण्याची वैधता मिळते.
- आम्ही भिन्न मतांचा आदर करतो.
- आम्ही राजकीय उमेदवार, राजकारणी, पक्ष किंवा राजकीय प्रचार प्रायोजित करत नाही.

### काय करा आणि काय करू नका:

- आमच्या सार्वजनिक व्यवहार आणि पैरवी संबंधी मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करा.
- आयोजित केलेल्या कोणत्याही सार्वजनिक घडामोडी आणि पैरवी क्रियाकलापांबाबत पारदर्शक रहा.
- Valmet च्या नावाने निर्णय घेणाऱ्यांशी बोलण्यासाठी सल्लागार, विकासक, पुरवठादार किंवा तत्सम लोकांचा वापर करू नका.



# समुदायाचा सहभाग आणि प्रायोजकत्व

- आमची वाढती जागतिक उपस्थिती, जगभरातील स्थानिक समुदायांप्रती असणारी आमची जबाबदारी वाढवते याची आम्हाला कल्पना आहे.
- आम्ही आमची सर्व युनिट्स आणि सर्व कर्मचाऱ्यांना सामुदायिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करतो.
- Valmet च्या जागतिक सामाजिक जबाबदारी कार्यक्रमाशी संरेखित असलेल्या उपक्रमांना आम्ही समर्थन देतो.

### काय करा आणि काय करू नका:

- आमच्या प्रायोजकत्व आणि देणगीच्या तत्त्वांचे पालन करा.
- राजकारण, धर्म किंवा इतर वादग्रस्त वैचारिक संघटनांशी संबंधित प्रकल्प किंवा उपक्रम प्रायोजित करू नका.
- राष्ट्रीय किंवा जागतिक दर्जाच्या स्पर्धा आणि व्यावसायिक खेळांना प्रायोजित करू नका.
- आपल्या मूल्यांशी विरोध करणारे क्रियाकलाप प्रायोजित करू नका.

# ऑपरेशन्सची पर्यावरणीय कार्यक्षमता

- आम्ही आमच्या कामाचा पर्यावरणीय प्रभाव समजून घेण्याचा आणि तद्नुषंगिक ठसा कमी करण्याचा प्रयत्न करतो.
- आम्ही आमच्या ऑपरेशन्समध्ये ऊर्जा, पाणी आणि भौतिक साहित्य यांचा कमीत कमी वापर करतो.
- आम्ही प्रदूषण आणि पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी खबरदारीचे उपाय लागू करतो.
- आम्ही आमच्या ऑपरेशन्समधे कचऱ्याचा पुनर्वापर आणि पुनर्प्राप्तीमध्ये गोलाकारपणाला प्रोत्साहन देतो.
- आम्ही घातक पदार्थांच्या वापराचे सतत निरीक्षण आणि व्यवस्थापन करतो.

### काय करा आणि काय करू नका:

- आमच्या पर्यावरण कायदे आणि नियम, HSE धोरण आणि जागतिक व्यवस्थापन प्रणाली यांचे काटेकोर पालन करा.
- आपल्या कामाच्या पर्यावरणीय परिणामांची माहितीआणि तदनुषंगिक मार्गदर्शक तत्त्वांबद्दल जागरूक रहा.
- पर्यावरणाचे संरक्षण करा आणि पर्यावरणीय प्रभाव आणि जोखीम कमी करा.
- आपल्या ऑपरेशन्स आणि व्हॅल्यू चेनचे पर्यावरणीय कार्यप्रदर्शन कसे सुधारायचे याबद्दल पुरवठादार, ग्राहक आणि इतर व्यावसायिक भागीदारांशी सक्रियपणे चर्चा करा.





# उत्पादने आणि सेवांमध्ये हवामान आणि गोलाकारपणा

- आम्ही आमच्या लगदा, कागद आणि ऊर्जा ग्राहकांना दीर्घ परिसंचरण, बंद चक्र आणि नूतनीकरणयोग्य आणि पुनर्नवीनीकृत कच्च्या मालाच्या वापराद्वारे गोलाकारता आणण्यास सक्षम करतो.
- आम्ही आमच्या लगदा, कागद आणि ऊर्जा ग्राहकांसाठी कार्बन न्यूट्रल उत्पादन सक्षम करतो.
- आमच्या प्रवाह नियंत्रण आणि ऑटोमेशन सोल्यूशन्सची सर्व प्रक्रिया उद्योगांच्या पर्यावरणीय आणि सुरक्षा कार्यप्रदर्शनात महत्त्वाची भूमिका आहे.
- ऊर्जा आणि संसाधन कार्यक्षमता सुधारण्यासाठी आम्ही आमचे प्रक्रिया तंत्रज्ञान, ऑटोमेशन आणि सेवा सतत विकसित करतो.
- आम्ही आमच्या ग्राहक स्थापित बेसचे जीवनचक्र वाढवणाऱ्या आणि अनुकुलित करणाऱ्या सेवा देतो.
- आम्ही अंतिम वापरकर्त्यांसाठी सुरक्षित असणारी सोल्यूशन डिझाइन करतो.

### काय करा आणि काय करू नका:

- आपल्या ग्राहकांना कमीत कमी पाणी, ऊर्जा आणि कच्चा माल आवश्यक असलेल्या सेवा आणि उपाय देण्यासाठी सक्रियपणे कार्य करा, अक्षय संसाधनांचा सक्षम वापर करा आणि कमीत कमी कचरा आणि उत्सर्जन निर्माण होत असल्याचे तपासा.
- ग्राहकांना त्यांच्या हरित संक्रमणामध्ये मदत करा आणि हवामान आणि गोलाकार समस्यांवर भागीदारांसोबत नाविन्यपूर्ण काम करा.
- ग्राहकांची सुरक्षितता आणि टिकाऊपणाची उद्दिष्टे समजून घेण्यासाठी त्यांच्याशी सक्रिय रहा.

# उत्पादन आणि सेवा गुणवत्ता

- आम्ही आमच्या ऑपरेशन्समध्ये आणि ग्राहकांना प्रदान करत असलेल्या उत्पादनांमध्ये तसेच सेवांमध्ये उच्च गुणवत्तेसाठी वचनबद्ध आहोत.
- शाश्वत व्यावसायिक संबंध सुनिश्चित करण्यासाठी आम्ही आमच्या ग्राहकांशी त्यांच्या गरजा आणि अपेक्षा समजून घेण्यासाठी त्यांच्याशी जवळून संवाद साधतो.
- संपूर्ण मूल्य शृंखलेत काम करण्याचा सुसंवादी मार्ग सुनिश्चित करण्यासाठी आम्ही आमची जागतिक व्यवस्थापन प्रणाली सतत विकसित करत असतो.
- आम्ही सर्वजण आमच्या कामाच्या गुणवत्तेसाठी आणि त्या सतत सुधारण्यासाठी वैयक्तिक जबाबदारी घेतो.

### काय करा आणि काय करू नका:

- आपल्या ऑपरेशन्सची गुणवत्ता सतत सुधारण्यासाठी सर्व घटना, निरीक्षणे आणि सुधारणेच्या कल्पना यांची नोंद ठेवा.
- तुम्ही वचन दिलेली गुणवत्ता नेहमी पूर्ण करा.
- खराब गुणवत्ता स्वीकारू नका.
- पुरवठादारांकडे गुणवत्ता नियंत्रण असल्याची खात्री करा.
- आपल्या जागतिक व्यवस्थापन प्रणालीचे नेहमी अनुसरण करा.





# शाश्वत पुरवठा साखळी

- आमचे शाश्वत पुरवठा साखळी धोरण जाणून त्यावर स्वाक्षरी करणे हा कोणत्याही पुरवठादारासाठी Valmet सोबत व्यावसायिक संबंधात प्रवेश करण्याचा प्रारंभ बिंदू आहे.
- आमच्या पुरवठादारांनी आमच्या शाश्वत पुरवठा साखळी धोरणात नमूद केल्यानुसार जबाबदारीने  व्यवसाय संचालित करावेत आणि उच्च नैतिक मानके दाखवावीत हीच आमची अपेक्षा आहे.
- आम्ही आमच्या पुरवठादारांची स्थिरता कामगिरी आणि जोखीम तपासतो आणि त्याचे निरीक्षण करतो.
- आम्ही आमच्या पुरवठादारांसोबत त्यांच्या ऑपरेशन्स आणि पुरवठा साखळीत शाश्वतता आणि हवामान कृती विकसित करण्यासाठी मदत करतो.

### काय करा आणि काय करू नका:

- आमच्या शाश्वत पुरवठा साखळी प्रक्रियेचे अनुसरण करा.
- सर्व पुरवठादार आमच्या शाश्वत पुरवठा साखळी धोरणावर स्वाक्षरी करुन त्यांचे काटेकोर पालन करतात याची खात्री करा.
- पुरवठादारांसोबत शाश्वततेला सक्रियपणे प्रोत्साहन द्या.

# गैरवर्तनाची तक्रार करणे

- आम्ही आमचे कर्मचारी आणि भागधारकांना बोलण्यास आणि त्यांच्या चिंता मांडण्यास प्रोत्साहित करतो. विशिष्ट परिस्थितीत सर्वोत्तम कारवाईबाबत शंका असल्यास कर्मचाऱ्यांनी त्यांच्या व्यवस्थापकांशी किंवा इतर योग्य कर्मचाऱ्यांशी संपर्क साधला पाहिजे. कृती करण्यापूर्वी विचारणे आवश्यक आहे.
- Valmet कर्मचारी आमच्या आचारसंहितेच्या किंवा इतर गैरवर्तणुकीच्या कोणत्याही संभाव्य उल्लंघनाची तक्रार व्यवस्थापकाला किंवा HR, कायदेशीर किंवा अंतर्गत ऑडिट फंक्शन्सना करण्यासाठी जबाबदार आहेत. गैरवर्तनाची तक्रार न करणे हे एक अनैतिक वर्तन मानले जाते.



- एखाद्याने तक्रार व चिंता बोलून दाखविल्यास ती ऐकून त्यावर कारवाई करणे ही व्यवस्थापकांची जबाबदारी आहे.
- Valmet आमच्या आचारसंहितेच्या संशयास्पद उल्लंघनाची तक्रार करण्यासाठी TrustLine, वेब-आधारित चॅनेल आणि कॉल सेंटर हे Valmet कर्मचारी आणि इतर भागधारकांना निनावीपणे आणि त्यांच्या मूळ भाषेत चिंता नोंदवण्याची शक्यता प्रदान करते.व तक्रार नोंदवता येते. या रिपोर्टिंग चॅनेलची देखरेख बाह्य पक्षाद्वारे केली जाते आणि जोपर्यंत रिपोर्टर स्वतःची ओळख आपणहून देत नाही तोपर्यंत निनावीपणाची हमी देण्यासाठी ते डिझाइन केलेले आहे.
- आम्ही संशयित उल्लंघनाची तक्रार करणाऱ्या प्रत्येकाची गोपनीयता कटाक्षाने बाळगतो.
- सद्भावनेने त्यांच्या चिंता व्यक्त करणाऱ्या किंवा संभाव्य उल्लंघनाच्या तपासात मदत करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध आम्ही कोणत्याही प्रकारचा बदला व सूडभावना सहन करत नाही.

आमची ही आचारसंहिता
तुमच्यासाठी, माझ्यासाठी आणि
आपण ज्यांच्यासोबत काम
करतो त्या प्रत्येकासाठी आहे
- सर्वत्र, दररोज.

www.valmet.com

Valmet

© Valmet Corporation, 12/2023